# उल्हासनगर महानगरपालिका,उल्हासनगर

जा.क्र. उमपा/आ.का./३४४/२०२१

दिनांक : ~~१७~~ २७ ऑगस्ट्, २०२१

## : परिपत्रक :

**विषय :- घरगुती आणि सार्वजनिक श्री गणेशोत्सव २०२१ संदर्भात सर्वसमावेशक मार्गदर्शक सूचना**

**वाचा :- १) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७**
**२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५**
**३) गृह विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.आरएलपी-०६२१/प्र.क्र.१४४/ विशा-१ब दिनांक २९ जून, २०२१**

वरील संदर्भ क्र. ३ अन्वये शासनाकडून श्री गणेशोत्सव २०२१ करिता प्राप्त परिपत्रकातील मार्गदर्शनास अनुसरुन पुढीलप्रमाणे मागदर्शक सूचना निर्गमित करणेत येत आहे. कोविड-१९ च्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता मागील वर्षापासून विविध उपक्रम, कार्यक्रम, सार्वजनिक उत्सव, सण अत्यंत साध्या पध्दतीने साजरे करण्यात आले आहेत. कोविडचा प्रादुर्भाव कमी झालेला असला तरीही धोका अद्यापही कायम आहे. त्यादृष्टीने सर्वांनी मोठया प्रमाणात एकत्रित येऊन उत्सव साजरा करणे उचित होणार नाही. या वर्षी दि. १० सप्टेंबर, २०२१ रोजी "गणेशोत्सव" हा सण असून तो अत्यंत साधपणाने साजरी करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरुन उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात "श्री गणेशोत्सव" साजरा करणेबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहेत.

**अ) सर्वसाधारण सूचना (General Instructions)**

१. कोरोना/ कोव्हीडच्या पार्श्वभुमीवर सार्वजनिक/गणेश मंडळांनी गणपतींची प्रतिष्ठापना करणे शक्यतो टाळावे असे आवाहन करण्यात येत आहे.

२. सर्व सार्वजनिक गणेश उत्सवासाठी गणेश मंडळाने महानगरपालिकेची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. महानगरपालिकेच्या प्रभाग कार्यालयामार्फत प्रचलित नियमानुसार सदर परवानगी देण्यात येईल. परवानगीसाठी http://smartumc.com/pandal_app/Mandal/mandal_registration या online portal वर अर्ज सादर करावेत.

३. कोविड-१९ या साथरोगाचा प्रादुर्भावामुळे उदभवलेल्या परिस्थितीचा विचार करता तसेच मा.उच्च न्यायालयाने वेळावेळी निर्गमित केलेल आदेश आणि महानगरपालिकेचे या संबंधीचे धोरण लक्षात घेता, मर्यादित आकारमानाचे मंडप उभारावेत. यावर्षीचा गणेशोत्सव साध्या पध्दतीने साजरा करणे अपेक्षित असल्याने घरगुती तसेच सार्वजनिक गणपतींची सजावट करताना भपकेबाजी नसावी.

४. श्री गणेशाची मुर्ती सार्वजनिक मंडळांकरिता ४ फुट व घरगुती गणपती २ फुटांपेक्षा जास्त उंच नसावी.

५. यावर्षी शक्यतो पारंपारिक गणेशमुर्ती ऐवजी घरातील धातू/संगमरवर आदी मुर्तीचे पूजन करावे. मुर्ती शाडूची/ पर्यावरणपुरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे. गणेशमुर्तीचे विसर्जन पुढे ढकलणे शक्य नसल्यास या मुर्तीचे विसर्जन माघी गणेशोत्सव विसर्जनावेळी किंवा २०२२ च्या भाद्रपदच्या महिन्यात पुढील

वर्षीच्या गणेश विसर्जनाच्या वेळी करता येणे शक्य आहे. जेणेकरुन विसर्जनासाठी गर्दी करणे टाळून स्वत:चे व कुटुंबियाचे कोविड-१९ या साथ रोगाच्या प्रादुर्भावापासून रक्षण करता येईल.

६. सांस्कृतिक कार्यक्रमाऐवजी आरोग्य विषयक उपक्रम उदाहरणार्थ रक्तदान शिबीरे इत्यादी आयोजित करण्यास प्राधान्य द्यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू, इत्यादी आजार आणि त्याचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करावी.

७. आरती, भजन, कीर्तन वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करताना गर्दी होणार नाही तसेच कोविड-१९ च्या अनुषंगाने लॉकडाऊन शिथिल कारण्यासंबंधीच्या शासनाच्या प्रचलित आदेशातील (Level of Restrictions for Breaking the Chain) तरतुदींचा भंग होणार नाही. याची खबरदारी घ्यावी. तसेच ध्वनि प्रदुषणांसदर्भातील नियमाचे व तरतुदींचे पालन करावे.

८. श्रीगणेशाच्या दर्शनाची सुविधा ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट व समाजमाध्यमे आदीव्दारे उपलब्ध करुन देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करावी.

९. गणपती मंडपांमध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच स्क्रीनिंगची पर्याप्त व्यवस्था करण्यात यावी. प्रत्यक्ष दर्शन घेवू इच्छिणा-या भाविकांसाठी भौतिक अंतराचे (फिजिकल डिस्टनसिंग) तसेच स्वच्छतेने नियम (मास्क्, सॅनिटायझर इत्यादी) पालन बंधनकारक राहील. लॉकडाऊन संदर्भातील शासनाच्या (Level of Restrictions for Breaking the Chain) प्रचलित आदेशामधील यासंबंधीच्या तरतूदी बंधनकारक असतील.

१०. सर्व घरगुती गणेशमुर्ती एकत्रितरित्या विसर्जनास परवानगी असणार नाही. सर्व घरगुती गणेशमुर्ती नागरिकांनी आपल्या जवळच्या प्रभाग समिती कार्यालयामध्ये द्याव्यात. त्यांचे विसर्जन प्रभाग समितीमार्फत विधीवत करण्यात येईल.

११. गणेशोत्सव विसर्जनाच्या तारखेस जर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा परिसर हा कंटेनमेंट झोनमध्ये असेल तर त्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास मंडपातच लोखंडी टाकी ठेवून किंवा तत्सम व्यवस्था करुन मुर्तीचे विसर्जन करणे बंधनकारक राहिल.

१२. जर विसर्जनाच्या तारखेच्या दिवशी घरगुती गणपती स्थित असलेली इमारत/चाळ जर "सिल्ड् इमारत" (Sealed building) मध्ये असेल तर त्यांना विसर्जनासाठी घरगुती गणेशमुर्ती बाहेर घेवून जाण्यास परवानगी असणार नाही. त्यांना सदर गणेशमुर्तीचे विसर्जन घरीच करणे बंधनकारक राहिल.

**<u>ब) सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासाठी सूचना</u>**

१. सार्वजनिक गणेश उत्सव मंडळाने मा.उच्च न्यायालयाने निर्गमित केलेले आदेश, शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना याचे पालन करणे बंधनकारक असेल.
२. मंडळाव्दारे स्थापित करण्यात येणा-या मुर्तीची उंची ४ फुट पेक्षा जास्त असू नये.
३. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी मंडपाचे आकारमान कमीत-कमी ठेवावे.

४. मंडपात एकावेळी ५ पेक्षा जास्त कार्यकर्ते उपस्थित राहू नयेत याची खबरदारी घ्यावी. उपस्थित सर्व व्यक्तिंनी मास्क् लावणे बंधनकारक आहे व भौतिक अंतर ठेवणे याचे काटेकोरपणे पालन होते आहे हे पाहण्याची जबाबदारी मंडळाच्या पदाधिका-यांची राहील.

५. मंडपाच्या मुख्य भागांचे दिवसांतून तीन वेळा निर्जंतुकीकरण (Sanitization) करावे, तसेच कार्यकर्ते आणि इतर व्यक्ती यांना वापरासाठी Sanitizers उपलब्ध करुन् दयावे.

६. भाविकांना दर्शनासाठी ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट, फेसबुक, समाज माध्यमे इत्यादीव्दारे सुविधा उपलब्ध करुन दयावी.

७. कोरोना विषाणुचा संसर्ग टाळण्यासाठी प्रसाद वाटणे/फुले व हार अर्पण इत्यादी बाबी टाळाव्यात.

८. गणेश मंडपाच्या परिसरात तसेच त्या लगतच्या रस्त्यांवर फुले, हार, प्रसाद इत्यादी विक्रीसाठी स्टॉल/दुकाने इत्यादी लावू नयेत.

९. श्री. गणेशाच्या आरतीच्या वेळी मंडपात दहापेक्षा (१०) जास्त कार्यकर्ते/भाविक उपस्थित असू नयेत. त्यांनी "मास्क" व "भौतिक" अंतरासंबंधीच्या नियमांचे काटेकोर पालन करावे.

१०. कोरोना विषाणूंची गंभीर आपत्ती लक्षात घेता मंडप सजावट/रोषणाई/देखावे करु नयेत.

११. मंडळातर्फे जनजागरण/रक्तदान आरोग्य तपासणी, लोकापयोगी आरोग्यभिमुख कार्यक्रम ॲन्टीजन टेस्टींग कँम्प आयोजित करावेत.

१२. कोणत्याही प्रकारच्या जाहिराती करण्यास मनाई आहे.

१३. ध्वनी प्रदुषणाच्या अनुषंगाने विहित करण्यात आलेल्या नियमांचे पालन करुन महापालिका/पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.

१४. गणेश मूर्तीच्या आगमन व विसर्जनच्यावेळी ५ पेक्षा अधिक लोक असणार नाहीत व ते "मास्क" वापरतील आणि भौतिक अंतर पाळतील याची खबरदारी घ्यावी व कोणत्याही प्रकारची मिरवणूक काढण्यात येवू नये.

१५. गणेश उत्सवाच्या विसर्जनाच्या तारखेस जर सार्वजनिक गणेशात्सव मंडळाचा परिसर हा कंटनमेंट झोन वा हॉटस्पॉट क्षेत्रात असेल त्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळास मंडपातच लोखंडी टाकी ठेवून किंवा तत्सम व्यवस्था करुन मुर्तीचे विसर्जन करणे बंधनकारक राहील.

**क) घरगुती गणेशोत्सव साजरा करणा-या भाविकासाठी सूचना**

१. घरगुती गणेशमुर्तीचे आगमन मिरवणूकीच्या स्वरुपाचे नसावे. आगमनासाठी जास्तीत जास्त ३ तीन व्यक्तींचा समूह असावा आगमनप्रसंगी मास्क्/शिल्ड स्वसंरक्षणाची साधने काटेकोररित्या वापरण्यात यावी आणि भौतिक अंतरासंबंधीच्या सूचनांचे काटेकोर पालने करावे.

२. घरगुती गणेशात्सवासाठीची मूर्ती शक्यतो शाडूची असावी व या मूर्तीची उंची दोन फूटापेक्षा जास्त असू नये किंवा शक्य असल्यास यावर्षी पारंपारिक शाडूच्या गणेशमूर्ती ऐवजी घरात असलेल्या धातू संगमरवर आदी मुर्तीचे पूजन करावे. जेणेकरुन आगमन/विसर्जनासाठी गर्दीत जाणे टाळून स्वत:चे कुटुंबियांचे कोविड-१९ साथरोगापासून संरक्षण करणे शक्य होईल.

३. भाविकांना स्थापन केलेल्या गणेशमूर्तीचे विसर्जन पुढे ढकलणे शक्य असल्यास या मुर्तीचे विसर्जन माघी गणेशोस्तव किंवा २०२१ च्या भाद्रपद महिन्यात पुढील वर्षीच्या विसर्जनाच्या वेळीदेखील करता येणे शक्य आहे. (त्यासाठी मूर्तीचे पावित्र्य राखणेसाठी पवित्र वस्त्रात गुंडाळून घरीच मूर्ती जतन करुन ठेवता येईल.).

४. गणेशमूर्ती शाडूची किंवा पर्यावरणपूरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे.

५. घर/इमारत गणेशोत्सव कालावधी प्रतिबंधित क्षेत्र (Containment Zone) म्हणून जाहीर केल्यास प्रतिबंधित क्षेत्राकरिता असलेल्या नियमांचे पालन करण्यात यावे.

६. जर विसर्जनाच्या तारखेच्या दिवशी घरगुती गणपती स्थित असलेली इमारत/चाळ जर “सिल्ड् इमारत ” (Sealed building)/ हॉटस्पॉट (Hotspot Area) मध्ये असेल तर त्यांन विसर्जनासाठी घरगुती गणेशमुर्ती बाहेर घेवून जाण्यास परवानगी असणार नाही. त्यांना सदर गणेशमुर्तीचे विसर्जन घरीच करणे बंधनकारक राहील.

७. उत्सवप्रसंगी अशी कोणतीही कृती करु नये. जेणेकरुन कोरोना विषाणूचा फैलाव होईल . अन्यथा अशा व्यक्ती साथरोग कायदा १८९७, आपत्ती निवारण कलम २०१९ ,भारतीय दंड संहिता १८६० कायदयान्वये कारवाईस पात्र ठरतील.

## <u>ड) विसर्जनासाठी सार्वजनिक/घरगुती गणेशमुर्ती स्विकृती केंद्रे.</u>

१. कोरोना/कोविड महामारीच्या काळामध्ये विसर्जन स्थळी भाविकांची होणारी गर्दी टाळण्यासाठी तसेच कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग समिती निहाय गणेशमुर्ती स्विकृती केंद्रे निर्माण करण्यात येतील. महापालिकेच्या वतीने विसर्जनासाठी गणेशमुर्तीच्या स्वीकार करुन पालिकेच्या कर्मचा-यांमार्फत विधीवत गणेशमुर्तीचे विसर्जन करण्यात येईल, सदर स्विकृत केंद्राची यादी यथोचित प्रसिध्द् करण्यात येईल.

२. ज्या घरगुती व सार्वजनिक गणेशमुर्तीचे विसर्जन आहे त्या ठिकाणी करणे शक्य नसेल अशा सर्व गणेशमुर्तीचे विसर्जन महानगरपालिकेमार्फत करण्यात येईल.

३. हौसींग सोसायटयांनी गृहसंकुलाच्या आवारात कृत्रिम तलाव अथवा तत्सम व्यवस्था निर्माण करुन श्रीगणेशांच्या मुर्तीचे विसर्जन करावे. कृत्रिम तलाव तयार करणेकरिता सेवाभावी संस्था व लोकप्रतिनिधी यांची मदत घ्यावी. याकरिता संबंधित प्रभाग अधिकारी यांचे सहकार्य घेण्यात यावे.

४. शासनाने, महापालिका पोलीस प्रशासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजुन काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखल अनुपालन करावे.

५. वरील सर्व सुचनांचे पालन करुन उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनास सहकार्य कराव, असे आवाहन करण्यात येत आहे.

**(डॉ.राजा दयानिधी** भा.प्र.से.)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

**सोबत : परिशिष्ट् दिनांक २९/०६/२०२१ रोजीचे महाराष्ट्र शासन गृह विभागाचे परिपत्रक**

**प्रत-**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव.
२. मा. पालकमंत्री तथा मंत्री नगरविकास विभाग महोदयांचे खाजगी सचिव.
३. मा. मुख्य सचिव महोदयांचे विशेष कार्य अधिकारी.
४. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग.
५. मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
६. मा. पोलीस आयुक्त, ठाणे.
७. मा.महापौर, मा.उप महापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्षनेता, मा.सभापती प्रभाग समिती, सर्व गटनेता, सर्व सन्माननीय महापालिका सदस्य यांचेकडे माहितीसाठी.
८. मा.सभापती, महिला व बालकल्याण समिती/आरोग्य परिक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती/महसूल समिती/पाणी पुरवठा व मलनिस्सारण समिती/सार्वजनिक बांधकाम समिती/नियोजन व विकास समिती/पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती/गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती/क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती.
९. सर्व मा.महापालिका सदस्य/सदस्या, उल्हासनगर महानगरपालिका.
१०. पोलिस उप आयुक्त, परिमंडळ - ४, उल्हासनगर.
११. सहाय्यक पोलिस आयुक्त, उल्हासनगर/अंबरनाथ.
१२. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, उल्हासनगर/मध्यवर्ती/विठ्ठलवाडी/हिललाईन पोलिस स्टेशन.
१३. जनसंपर्क अधिकारी, उ.म.पा. यांनी सदर परिपत्रकाची उचित माध्यमांव्दारे जास्तीत जास्त प्रसिध्दी करावी. व प्रत्यक्ष सण सुरु होण्यापूर्वी ४ दिवस दररोज प्रेस नोट व्दारे सदरचे परिपत्रक उचित माध्यमांव्दारे प्रसिध्द् करावे.
१४. अतिरिक्त आयुक्त, सर्व उप आयुक्त. सर्व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती कार्यालये.
१५. सर्व विभागप्रमुख.
१६. सिस्टीम मॅनेजर, संगणक विभाग यांजकडे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.

---

क्रमांक- आरएलपी- ०६२१/प्र.क्र. १४४/विशा १ ब — दिनांक- २९ जून, २०२१.

## परिपत्रक

### विषय- सार्वजनिक गणेशोत्सव २०२१ मार्गदर्शक सूचना

कोविड- १९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता या वर्षीचा गणेशोत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना करण्यात येत आहेत.:-

१. सार्वजनिक गणेशोत्सवासाठी गणेशोत्सव मंडळांनी महापालिका/स्थानिक प्रशासन यांची त्यांचे धोरणानुसार यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

२. कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता महापालिका तसेच संबंधित स्थानिक प्रशासनाचे मंडपांबाबतचे धोरण यांचेशी सुसंगत असे मर्यादित स्वरुपाचे मंडप उभारण्यात यावेत. या वर्षीचा गणेशोत्सव साध्या पध्दतीने साजरा करणे अपेक्षित असल्याने घरगुती तसेच सार्वजनिक गणपतींची सजावट करतांना त्यात भपकेबाजी नसावी.

३. श्रीगणेशाची मुर्ती सार्वजनिक मंडळांकरिता ४ फूट व घरगुती गणपतीकरिता २ फूटांच्या मर्यादेत असावी.

४. या वर्षी शक्यतो पारंपारिक गणेशमुर्तीऐवजी घरातील धातू/संगमरवर आदी मुर्तीचे पूजन करावे. मुर्ती शाडूची/पर्यावरणपूरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे. विसर्जन घरी करणे शक्य नसल्यास नजिकच्या कृत्रीम विसर्जन स्थळी विसर्जन करण्यात यावे.

५. उत्सवाकरिता वर्गणी/देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्वीकार करावा. जाहिरातींच्या प्रदर्शनामुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पहावे. तसेच आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंती देण्यात यावी.

६. सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्य विषयक उपक्रम/शिबीरे (उदा. रक्तदान) आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता यांबाबत जनजागृती करण्यात यावी.

७. लागू करण्यात आलेले Level of Restrictions for Breaking the Chain बाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार इतर निर्बंध कायम राहतील. त्यामध्ये गणेशोत्सवानिमित्त कोणतीही शिथीलता देता येणार नाही.

८. आरती, भजन, किर्तन वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करतांना गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

९. श्रीगणेशाचे दर्शनाची सुविधा ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट व फेसबुक इत्यादीद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करण्यात यावी.

१०. गणपती मंडपांमध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच थर्मल स्क्रीनिंगची पर्याप्त व्यवस्था करण्यात यावी. प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी शरिरीक अंतराचे (फिजिकल डिस्टन्सींग) तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनीटायझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

११. श्रींच्या आगमन व विसर्जन मिरवणूका काढण्यात येऊ नयेत. विसर्जनाच्या पारंपारिक पध्दतीत विसर्जन स्थळी होणारी आरती घरीच करुन विसर्जन स्थळी कमीत कमी वेळ थांबावे. लहान मुले आणि वरीष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जनस्थळी जाणे टाळावे. संपूर्ण चाळींतील/इमारतीतील सर्व घरगुती गणेशमुर्तींच्या विसर्जनाची मिरवणूक एकत्रितरित्या काढण्यात येऊ नयेत.

१२. महापालिका, विविध मंडळे, गृहनिर्माण संस्था, लोक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था इत्यादींच्या मदतीने गणेशमुर्तींच्या विसर्जनाकरिता कृत्रीम तलावांची निर्मिती करण्यात यावी.

१३. कोविड- १९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकीय शिक्षण विभाग तसेच संबंधित महापालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध करण्यात आली असून त्याचा सांकेतांक २०२१०६२९१३०८३६४७२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Sanjay Dagadu Khedekar

Digitally signed by Sanjay Dagadu Khedekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a53701d2758331055dd3c46d615f8367912b1c64cd218e709c1b4de20bdf4f85, cn=Sanjay Dagadu Khedekar
Date: 2021.06.29 13:19:25 +05'30'

**( संजय खेडेकर )**
उप सचिव, गृह विभाग.

**प्रत माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. उपसभापती, महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७. सर्व सन्माननिय विधान परिषद / विधानसभा सदस्य / संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
८. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११. सर्व मा. महापौर, महानगर पालिका
१२. मा. मुख्य सचिव यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१३. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
१६. सचिव व महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७. सर्व आयुक्त, महानगरपालिका
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९. सर्व पोलीस आयुक्त
२०. सर्व पोलीस अधीक्षक
२१. सर्व मुख्याधिकारी, नगरपालिका
२२. निवडनस्ती.